वाचले:- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३, दिनांक ०९/०१/२०१९.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३, दिनांक १३/०४/२०१९.

३) शासन परिपत्रक, क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३, दिनांक ०४/०४/२०१९.

क्र.साशा/अेआरके/कावि/२०१९/
जिल्हाधिकारी नंदूरबारयांचे कार्यालय,
नंदूरबार.दि. 07/06/2019

आदेश-

उपोद्घातातील अ. क्र. १ व २ अन्वये तसेच संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकान्वये जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ मधील नियम ११ (१) नुसार राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. जैव-वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्यस्तरीय सल्लागार समितीचे आहे. राज्यस्तरीय सल्लागार समितीप्रमाणेच जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्याबाबत या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. सबब वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार नंदूरबारजिल्हयासाठी जैव वैद्यकीय कचरा जिल्हास्तरीय सल्लागार समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | रचना | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, नंदूरबार | अध्यक्ष |
| २ | जिल्हा शल्यचिकित्सक, नंदूरबार | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार | सदस्य |
| ४ | मुख्याधिकारी, नगरपरिषद, नंदूरबार | सदस्य |
| ५ | आरोग्य अधिकारी, नगरपरिषद, नंदूरबार | सदस्य |
| ६ | प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य सचिव |
| ७ | इंडियन मेडिकल असोसिएशन, नंदूरबार | प्रतिनिधी |
| ८ | सिध्दीवीनायक एटरप्राईजेस नंदूरबार | प्रतिनिधी |

उक्त समिती मधील इंडियन मेडिकल असोसिएशन सदस्यांचा सदस्य पदाचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

जिल्हाधिकारी, नंदूरबार

प्रत:

(१) जिल्हाशल्यचिकित्सक, नंदूरबार
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार
(३) मुख्याधिकारी, नगरपरिषद, नंदूरबार
(४) आरोग्य अधिकारी, नगरपरिषद, नंदूरबार
(५) प्रादेशिक अधिकारी, जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ
(६) प्रतिनिधी,इंडियन मेडिकल असोसिएशन, नंदूरबार
(७)सिध्दीवीनायक एटरप्राईजेस नंदूरबार

जिल्हाधिकारी, नंदूरबार